गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १६ वा ● शुक्रवार ०२ जून २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 16 | Date : 02/06/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4

## आज दहावीचा निकाल

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी (२ जून ) दुपारी १ वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर केला जाणार असल्याची अधिकृत घोषणा राज्य मंडळातर्फे करण्यात आली.

राज्य मंडळाने इयत्ता दहावीची परीक्षा २ मार्च २०२३ ते २५ मार्च २०२३ या कालावधीत पार पडली. दहावीच्या परीक्षेला राज्यातून १५ लाख ७७ हजार २५६ विद्यार्थी बसले होते. त्यात ८ लाख ४४ हजार ११६ मुले आणि ७ हजार ३३ हजार ०६७ मुलींचा समावेश होता.राज्यभरातील ५ हजार ३३ केंद्रांवर दहावीची परीक्षा झाली होती.

दहावीचा निकाल कधी जाहीर होणार याची उत्सुकत होती. मात्र, आता निकालाची तारीख जाहीर झाली आहे. २ जूनला निकाल जाहीर झाल्यावर विद्यार्थ्यांना संकेतस्थळावर जाऊन निकालाची ऑनलाईन प्रिंटआऊट काढून घेता येणार आहे.

निकाल पाहण्यासाठीच्या लिंक :

1. mahresult.nic.in
2. https://ssc.mahresults.org.in
3. http://sscresult.mkcl.org

## जिल्ह्यात २,३ जूनला उष्णतेच्या लाटेसम स्थिती

सोलापूर/प्रतिनिधी : प्रादेशिक हवामान केंद्र, कुलाबा, मुंबईच्या अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यातील काही भागात दि. २ व ३ जून रोजी उष्णतेच्या लाटेसम स्थिती निर्माण होणार असल्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे गरजेशिवाय उन्हात जास्त फिरू नये, उन्हाच्या झळांपासून संरक्षण करण्यासाठी पुरेशी तयारी करूनच घराबाहेर पडावे.

डोक्यावर टोपी घालावी किंवा सुती कपडा गुंडाळावा. सोबत पाणी, लिंबू पाणी किंवा ओआरएस ठेवावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी केले आहे.

## सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

सोलापूर/प्रतिनिधी: जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक ५ जून २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू हॉलमध्ये आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील महिन्यातील प्रलंबित निवेदन व अर्ज, माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांच्या लोकशाही दिनातील अर्जावरही कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

# वारीसाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी..!

## चोख नियोजन करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

पंढरपूर/प्रतिनिधी : यंदा वारीसाठी अधिक गर्दी होऊ शकते, त्यामुळे वारकरी बांधवांना कोणतीही अडचण येऊ नये याची काळजी घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले आहेत. पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी चोख नियोजन करण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले. वारीसाठी येणाऱ्या वाहनांना परतीच्या प्रवासासह टोल माफ करण्यात येईल, अशी मोठी घोषणाही यावेळी मुख्यमंत्र्यांनी केली. पंढरीत दर्शनासाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना वेळेत दर्शन घेता यावं, यासाठी विशेष सुविधा करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आषाढी वारीच्या पूर्वतयारीसाठी आढावा बैठक घेतली होती, त्यावेळी त्यांनी महत्त्वाचे निर्देश दिले आहेत.




पंढरपूर आषाढी वारीसाठी निधीची कोणतीही कमतरता नाही. अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे नगरपालिकेसाठीच्या निधीत पाच वरून १० कोटींची आणि ग्रामपंचायतींकरिता २५ वरून ५० लाख रुपयांची अशी दुप्पट निधीची तरतूद केली आहे. याशिवाय रस्त्यांसाठीही वेगळा निधी दिला आहे, त्यामुळे रस्त्यांची परिस्थिती सुधारण्याबाबत काळजी घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. कोणत्याही परिस्थितीत रस्त्यांवर चिखल किंवा राडा-रोडी दिसता कामा नये, असेही निर्देश त्यांनी दिले. वारी मार्गावरील पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना देण्यात येणारा निधी दुप्पट केला आहे, तो तत्काळ वितरीत करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली. पंढरपूर आणि परिसरातील रस्ते वारीसाठी सुस्थितीत व्हावेत, यासाठी १० कोटी रुपयांचा निधी दिला गेला आहे. या निधीतून होणारी कामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, पालख्यांच्या प्रस्थानापूर्वीच वारीसाठीची सर्व सज्जता ठेवा. यंदा वारीसाठी गर्दी होण्याची शक्यता आहे, त्यामुळे वारी मार्गावर पाण्याच्या उपलब्धतेबाबत विशेष नियोजन करावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत मनुष्यबळ, यंत्रसामुग्रीची कमतरता भासणार नाही, असे चोख नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.पंढरपूर विभागातील आजुबाजुच्या महापालिका, जिल्हा परिषदा यांच्या । पान २ वर

## संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

नाशिक : वारकरी आणि पंढरीच्या विठुरायाच्या भेट लवकरच होणार असून आज श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांची पालखी दुपारी दोन वाजता पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. जवळपास २५ हजाराहून अधिक वारकरी, भाविक या पायी दिंडी पालखी सोहळ्यात सहभागी होणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर प्रशासनाकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनाची आस वारकऱ्यांना लागलेली असून वारकऱ्यांची पाऊले आज पंढरीच्या दिशेने चालू लागणार आहेत.



श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांची पालखी चांदीचा रथ पायी दिंडी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहे. नाशिक जिल्ह्यातून २५ हजार वारकरी या दिंडीत सामील होतील असा अंदाज आहे. यावर्षी एक दिवस अगोदर पालखी पंढरपूरला रवाना होणार असून पालखीचा पहिला मुक्काम त्र्यंबकेश्वर शहरांतील श्री पंचायती महानिर्वाणी आखाड्यात होणार आहे. या महानिर्वाणी आखाड्यात गुरु गहिनीनाथांची समाधी असल्याने इथे पहिला मुक्काम होणार आहे. यंदा जवळपास ४५ पालख्या आणि हजारो वारकरी पायी दिंडीत सहभागी झाले असून जिल्ह्यात वारकऱ्यांसाठी १२ फिरते शौचालय आणि पिण्याच्या पाण्याचे पाच टँकर । पान २ वर

## मी भाजपची आहे, पण भाजप माझा एकट्याचा पक्ष नाही..

### पंकजा मुंडेंच्या वक्तव्याने चर्चांना उधाण

मुंबई : राष्ट्रीय समाज पक्षाने बुधवारी (३१ मे) दिल्लीत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी केली. दरम्यान याच कार्यक्रमाच्या भाषणामध्ये भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे राजकीय चर्चेला उधाण आले आहे. त्या म्हणाल्या, मी भाजपची आहे, पण भाजप थोडाच माझा एकट्याच पक्ष आहे. महादेव जानकरांचा स्वतःचा पक्ष आहे तसा भाजप कुणी एकट्याचा नाही, ही पक्ष खूप मोठा आहे, मी त्याची एक कार्यकर्ती आहे, असं वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्या याच वक्तव्याचे आता वेगवेगळ्या पद्धतीने अर्थ काढले जात असून, यावर राजकीय प्रतिक्रिया देखील येत आहे.



पंकजा मुंडेंच्या अगोदर महादेव जानकरांचे भाषण झाले. त्यावेळी जानकर पंकजा मुंडेना भाजप हा वारंवार तुमचा पक्ष असे म्हणत होते त्यावर भाष्य करताना पंकजा मुंडेंनी वक्तव्य केले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष । पान २ वर

## 'खेळाडूंसोबत राष्ट्रवादी' अभियानाची प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलांकडून घोषणा; राष्ट्रवादी साधणार खेळाडूंशी संवाद

मुंबई : देशभरातील खेळासारख्या अत्यंत पवित्र क्षेत्रात कार्यरत व्यक्तींचं खचलेलं मनोबल सावरण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस खेळाडूंशी संवाद साधणार आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या क्षेत्रातील खेळाडूंशी नेते संवाद साधणार आहेत, त्यासाठी 'खेळाडूंसोबत राष्ट्रवादी' या अभियानाची सुरुवात करत असल्याची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी फेसबुक लाईव्हद्वारे केली.

राष्ट्रवादीच्या या अभियानांतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व आमदार, खासदार, जिल्हाध्यक्ष, तसेच सर्व नेते, पदाधिकारी हे त्यांच्या विधानसभा मतदारसंघातील तालुका, जिल्हयातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय राज्य आणि जिल्हा पातळीवरील विशेष कामगिरी बजावलेल्या खेळाडूंसोबत संवाद साधणार आहेत.राष्ट्रवादीचे पदाधिकारी विधानसभा मतदारसंघनिहाय आपापल्या भागातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा पातळीवरील सहभाग दाखवलेल्या आणि नोंदवलेल्या सर्व खेळाडूंची एकत्रित बैठक घेणार आहेत. शिवाय खेळाडूंच्या घरी जाऊन त्यांच्या भावना समजून घेऊन त्यांचे मनोधैर्य वाढेल अशा पध्दतीने त्यांची मदत करणार आहेत, खेळाडूंशी संवाद साधणार आहेत.



सध्या राष्ट्रीय पातळीवर खेळाच्याबाबतीत ज्या घटना घडल्या आहेत, त्याची माहिती संबंधित खेळाडूंना देऊन त्यांच्या प्रतिक्रिया देखील जाणून घेणार आहेत. यामध्ये महाराष्ट्र शासनाचे शिवछत्रपती पुरस्कार विजेते आणि अन्य पुरस्कार विजेत्यांना प्राधान्य दिलं जाईल. या बैठकीमध्ये । पान २ वर

## सांगलीत रोहिणीच्या पावसाचा धुमाकूळ

सांगली : जोरदार वाऱ्यासह गुरूवारी सायंकाळी सांगलीत रोहिणीच्या पावसाने धुमाकूळ घातला. पावसाने महापालिकेच्या नालेसफाई कामाचा पंचनामा करीत वाहन चालकांची तारांबळ उडवली. अनेक ठिकाणी वाऱ्यामुळे वीज वाहक तारा तुटल्या, खांब वाकले तर रस्त्यावर पाण्याची तलाव झाले. मात्र, जिल्ह्यातील तासगाव, कवठेमहांकाळ, मिरज भागात हलका पाउस झाला. दिवसभराच्या उकाड्यानंतर झालेल्या पावसाने हवेत सुखद गारवा निर्माण झाला आहे.गेल्या चार दिवसापासून पावसाचे वातावरण तयार होते, मात्र, पावसाची हजेरी खंडित स्वरूपात होत आहे. गुरूवारीही दिवसभर हवेतील तपमान ३९ अंशावर पोहचले असले तरी आकाशात दिवसभर ढगांचा राबता दिसत होता. सायंकाळी चार वाजलेनंतर जोरदार वारे आणि ढगांचा गडगडाट यासह दमदार पावसाने सांगली, विश्रामबाग, मिरज, कुपवाड परिसरात दमदार पावसाने हजेरी लावली. पंधरा मिनीटाच्या दमदार पर्जन्यवृष्टीनंतर रिमझिम पाउस अर्धा तास सुरू होता. यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. गणपती पेठ, कापड पेठ । पान २ वर

## अक्कलकोट मध्ये पंधरा दिवस झाले पाण्याचा ठणठणाट नगरपरिषद बरखास्त करण्याची मागणी

अक्कलकोट/महेश गायकवाड :अक्कलकोट शहरात पंधरा दिवस झाले पिण्याचे पाणी नाही यामुळे जनतेची पाण्यासाठी प्रचंड ससेहोलपट सुरू असून अक्कलकोट नगरपरिषद बरखास्त करून ग्रामपंचायत करावी अशी मागणी नागरिक करत आहेत.अक्कलकोट मध्ये पंधरा दिवस होऊन गेले पाण्याचा ठणठणाट सुरु आहे, पूर्वी १५ दिवसाआड पाणी पुरवठा होत होता तो आता पंधरा दिवसा नंतर ही होईना झाला आहे

यामुळे नागरिकांचे पण्यासाठी प्रचंड सुरू आहेत. पाण्यासाठी नागरीकांचे बेहाल करून पैसे कमविणारी अक्कलकोट ही जगातील पहिली नगरपरिषद असावी अशी प्रतिक्रिया नागरीक व्यक्त करत आहेत.

अक्कलकोट शहर हद्दीत असलेल्या सर्वच वार्डा मधील भागात तब्बल १५ दिवसानंतर ही पाणी पुरवठा होत नसल्यामुळे नागरीकांचे खुप हाल होत असून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. ऐन उन्हाळ्यात महिन्यातून केवळ दोनवेळाच पाणी सोडले जात आहे. पाणी असून देखील कधी मोटर जळते,कधी पाईप फुटते तर कधी लाईट नसते; अशा कारणामुळे वारंवार कृत्रिम पाणी टंचाई निर्माण होत आहे. अक्कलकोट नगरपरिषद च्या पाणी पुरवठा विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे येथील लोकांमध्ये तीव्र संताप आहे. इतकी पाणी टंचाई असतानाही नगरपरिषदे चे संबंधित अधिकारी मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून त्यांना अक्कलकोट मधील पाणीपुरवठा सुरळीत करायला आणि पाण्याची सोयकरून द्यायला त्यांना वेळ मिळत नाही त्यामुळे ते कोणत्याही कामासाठी तयार होतील पण पाणी पुरवठा सुरळीत करायला तयार होणार नाहीत. त्यामुळे आता येथील नागरीक तीव्र आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

अक्कलकोट मध्ये कुरनूर धरणात प्रचंड पाणीसाठा आहे हिल्ली बंधाऱ्यात ही मुबलक पाणी आहे परंतु हे पाणी आणण्यासाठी अधिकाऱ्यांची मानसिकता नाही अक्कलकोट च्या जनतेकडून पाण्याचे टॅक्स मात्र दर महा वसूल केले जाते पण पाणी पुरवठा मात्र महिन्यात एक वेळा केला जातो हा कुठला नाय आहे अशी संतप्त प्रतिक्रिया रिपाइं अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी व्यक्त केली येत्या ५ दिवसात अक्कलकोट शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करून तो एक दिवसाआड करण्यात यावे अन्यथा अक्कलकोट नगरपरिषद समोर तीव्र आंदोलन करू असा इशारा ही अविनाश मडीखांबे यांनी दिला आहे.

अक्कलकोट मध्ये पंधरा दिवस झाले पाण्याचा ठणठणाट सुरू असून याकडे कोणत्याही ठिकाण चे लोकप्रतिनिधी आवाज उठविण्यास समर्थ नाहीत त्यामुळे अक्कलकोट नगरपरिषद बरखास्त करून येथे ग्रामपंचायत करावी कारण अक्कलकोट हे ग्रामपंचायत च्या लायकीचे राहिले आहे असे ही नागरिक बोलत आहेत.



कुरनुर धरण परिसरात होत असलेल्या लाईटच्या लहरी पणामुळे पाणी उपसा करण्यात व्यत्यय येत आहे त्यामुळे पाण्याचा उपसा मोठ्या प्रमाणावर होत नाही त्यामुळेअक्कलकोट शहराला व्यवस्थित पाणी पुरवठा होईनासा झाला आहे, परंतु जवळपास एक्स्प्रेस फिडर नगरपरिषद च्या वतीने बसविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले असून जवळजवळ १३० पोल सद्या बसविण्यात आले आहेत हे काम ६० लाख रुपयांचे काम असून ते २० ते २५ दिवसांत पुर्ण होईल यानंतर अक्कलकोट शहरात पाण्याची समस्या राहणार नाही सद्या विजेच्या लोड शेडिंग मुळे पाणी उपसा व्यवस्थित होत नाही,परंतु एक्स्प्रेस फिडर चे काम पूर्ण झाल्यानंतर पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही **– सचिन पाटील,मुख्याधिकारी अक्कलकोट नगरपरिषद अक्कलकोट**



संस्थानकालीन तत्कालीन राजे साहेबांनी दहा हजार लोकसंख्येसाठी कार्यान्वित केलेली सांगवी पाईपलाईन आणि त्यांनी बांधलेल्या पाण्याच्या टाकीतून अक्कलकोट शहराला आठ दहा दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे.त्यानंतर एकाही नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना अक्कलकोटचा पाणी प्रश्न सोडवता आला नाही. पावसाळ्यातही अक्कलकोटला आठवड्याला पाणीपुरवठा होते ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. येणाऱ्या निवडणुकीत पाणी प्रश्न हा कळीचा मुद्दा ठरणार आहे.**– स्वामीनाथ हरवाळकर सर, कार्याध्यक्ष,संघर्ष समिती. अक्कलकोट**

अक्कलकोट शहरात पंधरा दिवस झाले पिण्याचे पाणी नाही यामुळे जनतेची पाण्यासाठी प्रचंड ससेहोलपट सुरू असून अक्कलकोट शहरात व आजूबाजूला असलेल्या कोल्ड स्टोरेज पाण्याच्या फेक्ट्री मात्र जोरात सुरू आहेत त्यांचा मोठ्या प्रमाणावर कोल्ड पाण्याचे जार विक्री चा व्यवसायात व्यवस्थित सुरू आहे.

अक्कलकोट शहरात वाढले कोल्ड पाण्याचे प्लांट अक्कलकोट शहर व परिसरात सुरळीत पाणी पुरवठा नगरपरिषद करत नसल्यामुळे याचा पुरेपुर आर्थिक लाभ पाणी विक्रेते उठवत आहेत , पाण्याचे प्लांट सुरू करून ते टँकर द्वारे व जार च्या माध्यमातून पाण्याची विक्री करत आहेत असे विक्री होणारे पाणी लाखो लिटर मध्ये आहे अक्कलकोट शहरातील सर्व मोठे हॉटेल्स तसेच छोटेमोठे उद्योग आणि कारखाने, तसेच बांधकाम ची ठिकाणे एस टी महामंडळ येथे खाजगी टँकर द्वारे दररोज लाखो लिटर पाण्याची विक्री केली जात आहे, असे अक्कलकोट शहरात पाणीपुरवठा करणारे र जवळपास १०० पाण्याचे टँकर आहेत

## ✻ सुविचार ✻

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### त्यावरील महत्त्वाचा उपाय...

देशामधील प्रत्येक शेतकरी आपापल्या हिशोबाने हव्या त्या शेतमालाला प्राधान्य देतो. त्यामुळे काही बाबतीत देश गरजेपेक्षा अधिक उत्पादन करतो, तर काही शेतमालाची मोठय़ा प्रमाणावर आयात करणे भाग पडते. कृषी धोरण आखताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले न गेल्यामुळे ही स्थिती उद्भवते. देशात यंदा विक्रमी म्हणजे ३३०.५ दशलक्ष टन अन्नधान्य उत्पादन झाल्याचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांच्या कठोर मेहनतीचे हे फळ आहे, या कष्टाचा अभिमान प्रत्येक भारतीयाने बाळगलाच पाहिजे. कमी पाऊस किंवा दुष्काळासारख्या स्थितीचे अपवाद सोडल्यास देशात अन्नधान्यांसह शेतीमालाच्या उत्पादनाचा वाढीचा कल कायम राहिला, हे खरे असले, तरी वाढत्या लोकसंख्येसाठी शेतीमालाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी सिंचनाच्या पुरेशा व्यवस्था निर्माण करता आल्या नाहीत. त्यामुळे केवळ मोसमी पावसावर अवलंबून शेती करणाऱ्या या देशात बारमाही पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. अशाही अवस्थेत शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन करणे ही बाब महत्त्वाची मानायला हवी. अन्नधान्याच्या बाबतीत मोठय़ा प्रमाणात स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी गेल्या पाच दशकांत जे प्रयत्न झाले, त्याचे हे फळ आहे. तरीही, अन्नधान्य उत्पादनाचा लाभ शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचवण्यात फार मोठे यश मिळत नसल्याचे चित्र फारसे आशादायक नाही. लागवडीखालील जमिनीत सतत होणारी घट हे शेती उत्पादनात वाढ करण्यातले आजचे आव्हान. त्याला एकरी उत्पादन वाढ करणे एवढाच पर्याय असू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकविलेल्या अन्नधान्याची नासाडी कमीत कमी होणे अधिक गरजेचे आहे. 'असोचॅम' या उद्योग संघटनांच्या संघाने २०१६ मध्ये वर्तविलेल्या एका अंदाजानुसार, एका वर्षांत सुमारे ९२६ अब्ज किमतीचे अन्नधान्य काढणीनंतर वाया जाते. वितरण प्रक्रियेतील अनागोंदी, अन्न वेळेत तयार न होणे, अन्नधान्य वेळेत न पोहोचणे आणि तयार केलेल्या अन्नाला खाण्यास नकार देणे, अशा किरकोळ कारणांतून ही नासाडी होत आहे. यापूर्वी चीन लोकसंख्या आणि अन्नधान्य उत्पादन दोन्हीतही पहिल्या क्रमांकावर होता. आता भारत लोकसंख्येच्या बाबत जगात पहिल्या क्रमाकांवर आणि अन्नधान्य उत्पादनात पहिल्या पाच क्रमांकांत आहे. म्हणजे भारताचा लोकसंख्यावाढीचा वेग लक्षात घेता, काहीच वर्षांत अन्नधान्याच्या बाबतीत असलेली स्वयंपूर्णता धोक्यात येण्याची शक्यता गृहीत धरायला हवी. खाद्यान्न सुरक्षित ठेवण्यासाठी गोदामे व शीतसाखळी आणि तेथील मालाचे शेवटपर्यंत सुरक्षित पोहोचणे ही अन्नधान्य प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची साखळी अधिक सक्षम करणे हा त्यावरील महत्त्वाचा उपाय.

संघर्षाच्या आकर्षणातून? मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय समाजाचा जगण्यातला मूलभूत संघर्ष किमान पातळीवर गेल्यामुळे हे असे काल्पनिक संघर्ष लोकांना हवेसे वाटत आहेत की काय अशी शंका येते. त्यात भारतातला मुस्लिम समाज बऱ्यापैकी निम्न आर्थिक स्तरांतला. पांढरपेशा मध्यमवर्गाच्या मनात या वर्गाविषयी एक आकस लहानपणापासूनच असतो. भाषा-वेष यांच्या भेदामुळे तो तीव्र होत जात असावा.

'मुसलमान फार माजोरडे आणि कट्टर' हा विचार मुस्लिमांशी प्रत्यक्ष संबंध न येताही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचवला जात असावा. अर्थात हे लोक मुस्लिमांचा द्वेष करतात याचा अर्थ समस्त हिंदूंवर प्रेम करतात असा अजिबात नाही. चार हिंदू लोक एकत्र आले की ते मुस्लिमांना शिव्या देणार, चार ब्राह्मण एकत्र आले की, मराठा-दलितादी ब्राह्मणेतरांची उणीदुणी काढणार, मग कोकणस्थ जमले की देशस्थांवर घसरणार, हेच लोक घरात आले की आपलं कुटुंब सोडून बाकीच्यांवर तोंडसुख घेणार. त्यांचं वर्तुळ हे असं लहान लहान होत जातं आणि अखेरीस स्वत:पुरतं उरतं.धार्मिक- राजकीय किंवा सामाजिक विषय आला की, हेच लोक पुन्हा समूह म्हणून एकत्र येतात, हिंसेच्या गप्पा हौतात्म्याचा मुलामा लावून मारू लागतात. तर्क वगैरे खुंटीला टांगून आपला सामूहिक अहंगंड कुरवाळत राहतात. 'काश्मीर फाइल्स'सारख्या सिनेमाच्या निमित्ताने जो सामूहिक अभिनिवेश बघायला मिळाला, तो काश्मिरी पंडितांवर झालेल्या अन्यायाहून भीषण होता. या अभिनिवेशाने आयुष्याच्या, कलेच्या प्रत्येक अंगात शिरकाव केला आहे.

एकंदर असहिष्णुता अनेक स्तरांवर ठळक होत चालली आहे. आस्तिक आणि नास्तिक हा भेद तर पूर्वीपासून आहे, पण तो व्यक्तिगत पातळीवर होता. एकाच कुटुंबात आस्तिक-नास्तिक व्यक्ती आपलं अस्तित्व राखून होत्या. आता आस्तिक असणं ही प्रदर्शनाची, गौरवाची-गर्वाची बाब होऊन गेली आहे, नास्तिकांकडे संस्कृतीबुडवे म्हणून बघितलं जाऊ लागलं आहे. गुढीपाडव्यासारख्या सणाच्या निमित्ताने निघणाऱ्या शोभायात्रा तर जास्तीतजास्त उन्मादी होत चालल्या आहेतच, पण रामनवमीसारख्या, आत्तापर्यंत बऱ्यापैकी सात्विकतेने, साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणालाही अत्यंत आक्रमक मिरवणुका काढण्यापर्यंत या समाजाची मजल गेली आहे. जय सियाराम ही प्रेमळ अभिवादनपद्धती मागे पडून जय श्रीराम'धर्मयुद्धाचे सुतोवाच करणारा नारा गावोगावी घुमू लागला आहे. भारतीय संस्कृतीचं वैशिष्ट्य असलेलं वैविध्य यात हरवत चाललं आहे हे समजून घेण्यापुरताही विवेक आपल्यात समाज म्हणून उरलेला नाही. हे

## कानठळ्या बसवणाऱ्या उन्मादाला थोपवताना

**– सायली परांजपे** **भाग : २**

दुसऱ्या कशाचं नाही तर टोकाच्या अंधभक्तीचंच फलित आहे. आपल्या आजूबाजूचे लोक याला सहज बळी पडत आहेत, त्याचं समर्थन करत आहेत आणि आपण त्यासाठी काहीही करू शकत नाही, ही भावना त्रासदायक आहे.

टोकाचा कडवटपणा

यातली आणखी वाईट बाजू म्हणजे या मुजोर अंधभक्तीविरोधात उमटणाऱ्या (तुरळक का होईना) प्रतिक्रियांमध्येही या आक्रमकतेचं प्रतिबिंब दिसू लागलं आहे. माझ्या कुटुंबात माझ्या आईच्या माहेरचे लोक रा. स्व. संघाशी संबंधित होते. माझे आजोबा एकेकाळी संघाचे प्रचारक होते, तिथे काही मतभेद झाल्यामुळे ते संघापासून दूर झाले होते, पण विचारांनी मात्र ते हिंदुत्ववादी होते. आमच्या घरात वडील, आजोबा, आजी सगळे राष्ट्रसेवादलाशी जोडलेले, समाजवादी विचारांचे. तरीही या दोन्ही कुटुंबांत कधी कडवटपणा आला नाही. माझ्या आईचे काका नेहमी म्हणायचे की, दंगलीत हिंदू कधी पहिला वार करत नाही,

संरक्षणासाठीच वार करतो वगैरे. एकदा त्यांनी दाढीला मेंदी लावली होती. त्याचदरम्यान बाबरी मशीद पाडल्यामुळे दंगली झाल्या. त्यांना कोणीतरी लाल दाढीमुळे मुसलमान समजून काठ्या मारल्या. आम्ही त्यांची त्यावरून खूप चेष्टा करत होतो. तुम्हाला मुसलमान समजून मारलं म्हणजे हिंदूनीच केला ना पहिला वार, वगैरे म्हणत होतो. तेही हसण्यावारी न्यायचे. त्यावरून कधीच भांडणं वगैरे झाली नाहीत.

आता असे विषय काढायचा धोका नातेवाईकांमध्ये पत्करलाच जाणार नाही.

अनेक वर्षं बंद असलेल्या आईच्या माहेरच्या घरी काही महिन्यांपूर्वी जाण्याचा योग आला. लहानपणी जिथे अनेक सुट्या घालवल्या, तिथल्या वस्तू वगैरे बघून नॉस्टॅल्जिया जागा झाला होता. तेवढ्यात एका कपाटावर 'मंदिर वही बनाएंगे' लिहिलेलं स्टिकर दिसलं आणि एकदम अस्वस्थ व्हायला झालं. खरं तर हे स्टिकर लहानपणी नेहमीच बघितलेलं होतं. आजोबा एरवी कोणाबरोबर मंदिरात गेले, तरी हातही जोडायचे नाहीत एवढे नास्तिक होते. 'तुम्ही तर देव वगैरे मानतच नाही, मग राममंदिर कशाला हवंय' किंवा 'बाबराची नोंद इतिहासात आहे, राम तर पुराणातला. मग मशीद पाडून तिथे मंदिर कशाला बांधायचं' वगैरे प्रश्न आजोबांना वयाच्या नवव्या-दहाव्या वर्षी विचारले होते. त्यावर त्यांनी त्यांच्या परीने काही उत्तरं दिली होती. तरीही या स्टिकरकडे बघून त्यावेळी अस्वस्थ वगैरे वाटलं नव्हतं. बाबरी मशीद पाडली गेली, देशभरात दंगली झाल्या, तरीही असणार प्रत्येकाची वेगवेगळी मतं असाच दृष्टिकोन त्यावेळी होता. आज त्या तीसेक वर्षांपूर्वीच्या स्टिकरला गेल्या वर्षभरात राममंदिराबाबत चाललेल्या उन्मादाचा संदर्भ आला होता आणि ते स्टिकर लावणारी, आपल्या जवळची, व्यक्ती आपल्यापासून खरं तर खूप दूरच होती अशी भावना आली होती.

त्यावेळी त्या स्टिकरकडे बघून जे वाटलं नव्हतं, ते आज वाटतंय यामागे इतरही अनेक कारणं असावीत. ते वय कदाचित या सगळ्याचं गांभीर्य समजून घेण्याइतपत प्रगल्भ झालेलं नव्हतं हेही आहे. दुसरी एक शक्यता आणखी अस्वस्थ करणारी आहे.

जे आपल्यासारखं ते चांगलं, बाकी सगळं वाईट या अंधभक्तीतल्या मूलभूत लक्षणांकडेच आपणही सरकू लागलो नाही ना? आपले विचार कितीही वेगळे असले तरी त्यापलीकडचं नातं आपल्यात आहे, हा दिलासा पूर्वी होता, तो आता नाहीसा होत चालला आहे की काय? आणि तो नाहीसा होण्याला अंधभक्तीची मानसिकता तर कारणीभूत आहेच, पण तिला प्रतिक्रिया म्हणून आपल्याही मनात अंधभक्तांबद्दल द्वेषाची भावना तर मूळ धरू लागलेली नाही? आज दोन व्यक्तींमध्ये, दोन संस्थांमध्ये सर्वत्र सुडाची, द्वेषाची भावना पसरलेली दिसते. या द्वेषभावनेची लागण आपल्यालाही झालेली तर नाही?

कौटुंबिक समारंभांमध्ये जमणाऱ्या अंधभक्तांच्या मांदियाळीत आपली मतं न मांडणं किंवा त्यांच्या विचारांचा प्रतिवाद करणं, विषारी मेसेजेस फॉरवर्ड करणाऱ्या व्हॉट्सअ‍ॅप गृप्समधून बाहेर पडणं किंवा त्या गृपमध्येच राहून मेसेजेसना उत्तरं देणं या सगळ्याहून अंधभक्तांच्या मनातला द्वेष आपल्या मनात शिरू न देणं हेच याक्षणी महत्त्वाचं होऊन गेलंय.

देश म्हणून ही दिशा नेमकं काय सूचित करतेय? ही कशाची लक्षणं आहेत? कशाची पूर्वसूचना आहे?

**सायली परांजपे**

**समाज-संस्कृती आणि राजकारणाच्या अभ्यासक, अनुवादक आणि कनक बुक्स'तर्फे प्रकाशित 'शहीद भगतसिंग' या चरित्रात्मक पुस्तकाच्या लेखिका आहेत.**

पान १ वरुन

### वारीसाठी येणाऱ्या वाहनांना..

यंत्रणाचीही मदत घेण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. वारी मार्गावर ठिकठिकाणी वारकऱ्यांसाठी सावलीसाठी चांगल्या पद्धतीचे तंबू-निवारे उभे राहतील, पंखे लावले जातील, याची काळजी घेण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. वैद्यकीय पथकं, त्यातील तज्ज्ञ आणि रुग्णवाहिका यांचीही सज्जता ठेवण्याचे निर्देश त्यांनी केले. औषधं, पिण्याचं पाणी, अन्य आरोग्य सुविधा यांबाबत वेळीच नियोजन करा, असंही ते म्हणाले.

रस्त्यांसाठी भरघोस निधी दिल्याने रस्त्यांवर चिखल आणि राडा-रोडी दिसू नये, असं मुख्यमंत्र्यांनी ठणकावून सांगितलं. पालखी मार्गासह वारीत येणाऱ्या वाहनांना टोलमाफी करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना दिले. ते म्हणाले की, वारीत सहभागी होणाऱ्या वाहनांना टोल द्यावा लागू नये, यासाठी पोलीस विभागाने स्टीकर्स किंवा पासेसच्या माध्यमतून कार्यवाही करावी. पालखी मार्गावरील टोल नाके सुरु होणार नाहीत. त्याबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याशी संपर्क साधून त्यांना याबाबत कल्पना दिल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

जी-२० चे प्रतिनिधी मंडळ आषाढी वारीच्या काळात पुण्यात येणार आहे. त्यांना पंढरपूरची वारी आणि त्या अनुषंगाने या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे. या प्रतिनिधींना आपल्या संस्कृतीतील वैशिष्ट्यपूर्ण वारीचे दर्शन घडवण्यासाठी उत्तम नियोजन करा, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावर्षी वारीसाठी ६० टक्क्यांहून अधिकचे मनुष्यबळ, तसेच पाण्याकरिता टँकर्सची संख्याही दुप्पट करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या सहकार्याने नियोजन करण्यात येत असल्याची माहिती दिली.

### संत निवृत्तीनाथ महाराज..

प्रशासनाकडून उपलब्ध करून दिले जाणार आहेत. महत्त्वाचं म्हणजे दरवर्षी चतुर्दशीच्या दिवशी होणारे प्रस्थान यंदा त्रयोदशीला होणार आहे. तर संत निवृत्तीनाथांच्या पालखीला निरोप देण्यासाठी विदर्भ मराठवाड्यातील विशेषता बीड जिल्ह्यातील भाविक वारकरी देखील त्र्यंबकेश्वरमध्ये दाखल आहेत. गुरुवारी निर्जला एकादशी दिनी बीड जिल्ह्यातील जवळपास दहा हजार भाविकांनी पहाटेच ब्रह्मगिरी प्रदक्षिणा प्रारंभकरीत नगरीत हजेरी लावली.

संत निवृत्तीनाथांच्या दिंडीत नाशिक जिल्ह्यातील २५ हजाराच्या वर मानकरी दिंड्या सामील होतात. या दिंड्यांचे प्रमुख मानकरी विणेकरी, टाळकरी, चोपदार यांच्यासह काही वारकरी थेट त्र्यंबकेश्वरपासून दिंडीत सामील होतात. पालखी दिंडीच्या पायी वाटचाल मार्गात नाशिक जिल्ह्यातून विविध गावांवरून, ठिकाणावरून पंचवीस हजारावर वारकरी दिंडीच्या मार्गात सामील होणार आहेत. दिंडीनगर जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर सुमारे चाळीस हजार वारकरी संत निवृत्तीनाथांच्या दिंडीत सामील होतील असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सात वर्षांपूर्वी सुमारे एक कोटी रुपये खर्च करून मागील यापूर्वीच्या विश्वस्त मंडळांने चांदीचा रथ पालखी सोहळ्यासाठी तयार केलेला आहे. या रथाला झळाळी देण्यात आली असून आज दुपारी हा रथ बाहेर काढला जाणार आहे. फुलांच्या सजावटीसह आकर्षक अशा रथाला सर्जा राजाची जोडी सोबतीला असणार आहे.

### मी भाजपची आहे, पण भाजप ..

चंद्रशेखर बावनकुळे यांनी पंकजा मुंडे यांच्या वक्तव्याचा विपर्यास केल्याचं म्हटलं आहे. पंकजाताई भाजप माझ्या पाठिशी आहे, असंच म्हणाल्या, असं बावनकुळे म्हणाले कुस्तीपटूंचं दिल्लीत सुरु असलेल्या आंदोलनावरून भाजप खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांनी स्वतःच्याच पक्षाला घरचा आहेर दिला असतानाच, आता पंकजा मुंडेंच्या एका वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दिल्लीत आयोजित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात बोलताना पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे की, मी भाजपची आहे, पण भाजप ही पार्टी माझी थोडीच आहे. मला भीती वाटत नाही. कशाचीच भीती वाटत नाही. भीती न वाटणं हे आमच्या रक्तातच आहे. कशाची चिंता नाही. काही नाही मिळालं तर मी ऊस तोडायला जाईल. आम्हाला काही गमवायचंच नाही. आम्हाला आयुष्यात कोणत्याही गोष्टीची आस्था, अपेक्षा आणि लालसा नाही, असं पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. तर त्यांच्या याच वक्तव्यावरून आता चर्चांना उधाण आले आहे.

दरम्यान, पंकजा मुंडे यांच्या या वक्तव्यानंतर एकदा अनेक राजकीय प्रतिक्रिया समोर येत आहे. ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांची देखील पंकजा मुंडे यांच्या वक्तव्यावर प्रतिकिया आली आहे. पंकजा मुंडे यांनी त्यांची व्यथा बोलून दाखवली. ज्यांनी भाजप शून्यातून निर्माण केला, त्याचं आज अस्तित्त्व काय उरलंय? राजकीय कुटुंबातील व्यक्तींनी परिणामांचा विचार न करता निर्णय घेतला तरच त्यांचं अस्तित्त्व टिकून राहील, असे संजय राऊत म्हणाले आहेत.

### 'खेळाडूंसोबत राष्ट्रवादी' अभियानाची..

झालेल्या संवादाची थोडक्यात माहिती राष्ट्रवादी प्रदेश कार्यालयात कळवली जाईल. खेळाडूंचे प्रश्न, समस्या आणि दिल्लीत झालेल्या घटनेबद्दल भारतातील खेळाडूंचं मनोधैर्य खचलं आहे, खेळाडूंशी यंत्रणा अशीही वागू शकते, याबाबतीत त्यांचं मनोधैर्य वाढवण्याचं काम करणार आहेत.

ज्या खेळाडूंची भेट घेतली जाईल त्यांचे फोटो आणि व्हिडीओ छउझथळींहउहराळिपी या हॅशटॅगसह सोशल मिडियावर प्रसिद्ध केले जाणार आहेत. खेळाडूंसोबत बैठक ८ जूनच्या आतमध्ये घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रातील खेळाडूंपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व कार्यकर्ते पोहोचूया, असा संकल्प करण्यात आला आहे. देशात आणि महाराष्ट्रात शरद पवारांनी नेहमीच खेळाडूंना आधार दिला आहे, त्याच पद्धतीने मनोधैर्य घसरलेल्या महाराष्ट्रातील सर्व खेळाडूंचे मनोधैर्य उंचावण्याचे काम करुया, असं आवाहन जयंत पाटील यांनी केलं आहे.

दिल्लीमध्ये राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंबाबत ज्या घटना घडल्या, त्यामुळे देशात एक प्रकारची अस्वस्थता पसरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस नेहमीच देशातील आणि महाराष्ट्रातील खेळाडूंबरोबर आहे. क्रीडा क्षेत्रात शरद पवारांनी रचनात्मक कार्य केलं आहे. क्रिकेट, खो-खो, कबड्डी, कुस्ती

या क्षेत्रातील खेळाडूंशी संवाद साधत उत्तमोत्तम खेळाडूंना पुढे येण्याची संधी निर्माण करुन देण्याचं काम केलं आहे. अनेक कुस्तीगीर खेळाडूंना अडचणीच्या काळात पवारांनी मदत करुन हात दिला, कारण ते आपल्या देशाचे नावलौकिक वाढवतात. देशासाठी पदकं घेऊन येणार्या किंवा विशेष कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंकडे शरद पवारांचं नेहमीच लक्ष असतं, असंही जयंत पाटील म्हणाले

### सांगलीत रोहिणीच्या पावसाचा

हरभट रोडवर पदपथ विक्रेत्यांची स्थिती गंभीर झाली होती. अचानक आलेल्या पावसाने दुचाकीस्वारांची पावसाचा मारा चुकवण्यासाठी रस्त्यावरील इमारत, दुकाने, झाडे यांचा आडोसा घेतला होता. सांगली-मिरज रस्त्यावर लावण्यात आलेले डिजीटल फलक जोरदार वार्याने फाटले. तासगाव, विटा परिसरातही हलका पाउस झाला. मात्र वार्याचा जोर जास्त होता.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी निगडित ऐतिहासिक वस्तूंचे संकलन करणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्य हे रयतेचे राज्य होते. सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय त्यांनी घेतले. त्यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी जगभरात असलेले शिवकालीन साहित्य आणि वस्तूंचे सांस्कृतिक कार्य विभागातर्फे संकलन करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिन सोहळ्याच्या ३५० व्या वर्षानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्याचा प्रारंभ गेट वे ऑफ इंडिया येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शिवकालिन शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, सौ. सपना मुनगंटीवार, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चवरे, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, उपसचिव विलास थोरात, श्रीनिवास वीरकर, विनीत कुबेर आदी उपस्थित होते. आज पहिल्या दिवशी महानाट्य : 'जाणता राजा'चे सादरीकरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे, मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी शस्त्र प्रदर्शनाची पाहणी करून सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच कलाकारांनी सादर केलेल्या युद्धकला प्रात्यक्षिकांनाही दाद दिली.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज अतिशय कुशल संघटक आणि प्रशासक होते. याची साक्ष शिवाजी महाराजांनी बांधलेले गड, किल्ले पाहिल्यावर येते. शिवाजी महाराजांनी रयतेची काळजी घेतली. त्यांच्या राज्याभिषेक सोहळ्यास ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त किल्ले रायगडावर शुक्रवार २ जून रोजी कार्यक्रम होत आहे. हा क्षण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी सांस्कृतिक कार्य विभागातर्फे सुरू असलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आणि या विभागाचे मंत्री श्री. मुनगंटीवार यांचे कौतुक केले. मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, शिवराज्याभिषेक सोहळ्यास उद्या २ जून रोजी किल्ले रायगडावर प्रारंभ होईल. या सोहळ्यात राज्यातील १ हजार १०८ नद्या आणि जलाशयातील पाण्याने अभिषेक करण्यात येईल. छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेली वाघनखे आणि जगदंबा तलवार पुन्हा आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यानुसार वाघनखे दर्शनासाठी देण्याचे ब्रिटन सरकारने मान्य केले आहे. याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या



सेनापतींवर आधारित टपाल तिकिटांचे प्रकाशन या कालावधीत व्हावे, असा प्रयत्न सुरु आहे. त्याचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय, राज्यभर महानाट्य 'जाणता राजा'चे प्रयोग करण्यात येतील. छत्रपती शिवाजी महाराजांवरील सर्वोत्कृष्ट दहा चित्रपटांचा महोत्सव आयोजित करण्यात येईल. या वेगवेगळ्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात येतील, असेही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले.महाराष्ट्राचा हा अभिमान आणि गौरवशाली इतिहास जगासमोर जाण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग प्रयत्न करीत असून त्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले. सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक श्री. चवरे यांनी आभार मानले.

शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या ३५० व्या वर्षानिमित्त राज्य शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाच्या पुढाकाराने गेट वे ऑफ इंडियाच्या परिसरात शिवकालिन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. त्याचेही उदघाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात तलवार, पट्टा, कट्यार, गुर्ज, भाला, खंजीर, चिलखत, गुप्ती, बंदूक अशी जुन्या काळातील चारशेहून अधिक शस्त्रे नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. दिनांक २ ते ६ जून २०२३ या कालावधीत गेट वे ऑफ इंडियाच्या गाभाऱ्यात शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन व शस्त्रास्त्र वापराची प्रात्यक्षिके प्रदर्शित होतील. याशिवाय दिवसातून चार वेळेस युद्ध कला सादरीकरण व शस्त्रास्त्रांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त २ जून रोजी राजस्थानी लोककला, शनिवार ३ व रविवार ४ जून रोजी महाराष्ट्राची लोककला, सोमवार ५ ते बुधवार ७ जून २०२३ या कालावधीत गोवा व गुजरात राज्याच्या लोककलेचे सादरीकरण होणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत गोगांव वतीने नारीशक्ति पुरस्कार वितरण

## सरपंच वनिता सुरवसे यांच्या हस्ते राणी सुरवसे व भौरमा तावरखेड यांना नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मान




अक्कलकोट/प्रतिनिधीः पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत गोगाव यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल गावातील दोन महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोगावचे सरपंच सौ वनिता सुरवसे ह्या होत्या,प्रमुख उपस्थिती उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक दयानंद चोळे,ग्रामसेवक विक्रम घाटे, कल्लप्पा बनसोडे हे होते. यावेळी प्रतिमा पूजन ज्येष्ठ सदस्य प्रदीप जगताप व पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बचत गटामध्ये उल्लेखनीय कार्य करून स्वतः गारमेंट कापड दुकानाचा व्यवसाय चालू केल्यामुळे, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सौ राणी विकास सुरवसे यांना सरपंच सौ वनिता सुरवसे यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले व ग्रामीण भागातील अशिक्षित महिलांना आरोग्य विषयक जनजागृती करून त्यांना आरोग्य विषयक माहिती देऊन सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सौ भौरम्मा तावरखेड यांचा सदस्या सौ महादेव मुलगे यांच्या हस्ते सन्मानपत्र , सन्मानचिन्ह देऊन गौविण्यात आले.

यावेळी बोलताना सरपंच वनिता सुरवसे म्हणाल्या की, महीलाने स्वतःच्या पायावर उभे राहावे,आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुढे आहेत आत्ता ग्रामीण महिला ही जागृत होत आहेत, महिलांनी घराबाहेर पडले पाहिजे, स्वतःच्या हिमतीवर व्यवसाय चालू केले पाहिजे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी स्वतः हिम्मत न हरता स्वतःच्या पायावर उभे राहून इतिहास रचला, अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागले तरी त्यांनी न खचता त्याने लढत राहिल्या त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण सर्व महिलांनी स्वतःचे पायावर उभे राहणे गरजेचे आहे, आजच्या पुरस्कार्थी महिलांचे मनापासून अभिनंदन. यावेळी अंगणवाडी सेविका तेजाबाई गुरव,भाग्यश्री सोनकवडे यांच्यासह बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रम सूत्रसंचालन व आभार उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी केले.

# स्वेरीमध्ये 'ॲप्लीकेशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर प्रॉडक्ट डेव्हलपमेंट अँड रिसर्च' या विषयावर कार्यशाळा संपन्न




पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर ता. पंढरपूर येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग व कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'ॲप्लीकेशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर प्रॉडक्ट डेव्हलपमेंट अँड रिसर्च' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये 'जिष्ट' तथा ग्लोबल इनोव्हेशन थ्रू सायन्स अँड टेक्नोलॉजी फोरमचे सदस्य डॉ.आनंद राव हे अमेरिकेतील बोस्टन या शहरामधून स्वेरीतील विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करत होते.

स्वेरीचे संस्थापक सचिव तसेच कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार व कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.स्वाती पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार व आयआयसी प्रेसिडेंट डॉ.विद्याराणी क्षीरसागर यांच्या सहकार्याने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ.आनंद राव यांनी आपल्या मार्गदर्शनातून 'डेटा सायन्सच्या मूलभूत गोष्टी, त्याची साधने आणि विविध तंत्रज्ञान जाणून घेऊन त्याचा वापर कसा करायचा हे समजावून सांगितले. विविध उद्योगांमध्ये डेटा सायन्सचा वास्तविक वापर जाणून घेणे व डेटा सायन्समध्ये करिअर करण्यासाठी आवश्यक कौशल्ये या विषयी माहिती दिली. मशीन लर्निंगच्या मूलभूत गोष्टी, चॅट जीपीटी या सारख्या विविध नवनवीन तंत्रज्ञानाची तसेच मशीन लर्निंग आणि डीप लर्निंगमध्ये वापरले जाणारे टूल्स, फ्रेमवर्क आणि तंत्रज्ञानाबद्दल विस्तृतपणे माहिती दिली. मशीन लर्निंग आणि डीप लर्नींगचा वास्तविक जगात वापर करण्यासाठीचा दृष्टीकोन कसा विकसित करावा हे देखील त्यांनी समजावून सांगितले. 'जेंव्हा विद्यार्थी मशीन लर्नींग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स मध्ये करिअरच्या दृष्टीने काम करतील तेव्हा त्यांना त्या क्षेत्रात उत्तम पद्धतीने कामगिरी करता येईल' असे प्रतिपादन केले. या कार्यशाळेला प्राध्यापक व जवळपास २४० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा.स्मिता गावडे, डॉ.निखिलेशकुमार मिश्रा व एमसीएचे विभागप्रमुख प्रा.मनसब शेख यांनी काम पाहिले. विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# जीवनाच्या उन्नती करिता भाविकांनी स्वामींना शरण यावे : आमदार बी.आर.पाटील



अक्कलकोट/प्रतिनिधी : येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराजांचे अनेक भक्त आहेत.

वेळोवेळी ते येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन स्वामींचे दर्शन घेत असतात व आपल्या समस्या स्वामींसमोर मांडतात. स्वामी कृपेने अनेक भाविकांचे संघर्षमय जीवन तारून उद्धार झालेले आहे. मी पण एक स्वामीभक्त असून माझ्या राजकीय जीवन वाटचालीत अनेक समस्या संघर्ष यांना सामोरे जात असताना केवळ स्वामी कृपेने मानसिक बळ मिळत गेले. त्यामुळे आमच्या राजकीय जीवनाची उन्नती होऊन जनसेवेची संधी मिळालेली आहे. ही सर्व स्वामींची कृपा आहे. स्वामी भक्तीत लीन होऊन स्वामी चरणी शरण गेल्याने हे साध्य झालेले आहे.

त्यामुळे भाविकांनी आपल्या जीवनाच्या उन्नती करिता स्वामींना शरण यावे असे मनोगत जेष्ठ गांधीवादी नेते व आळंदचे नूतन आमदार बी.आर.पाटील यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी आमदार पाटील यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी आमदार पाटील बोलत होते. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, गिरीश पवार, श्रीकांत मलवे आदींसह जिद्दीमनी, दत्तकुमार साखरे, शिवराज बिराजदार, प्रमोद पाटील, विद्याधर गुरव, प्रशांत बिराजदार, अभियंता किरण पाटील, शिवशरण इचगे उपस्थित होते.

# अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाने अभिनव संकल्पना राबवित आहे : नारायणराव विंचूरकर सरदार




अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाने अभिनव संकल्पना राबवित असल्याचे मनोगत नाशिक त्र्यंबकेश्वर देवस्थानचे नारायणराव विंचूरकर सरदार यांनी व्यक्त केले.ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, नामा भोसले, दत्ता माने, प्रवीण घाटगे, निखिल पाटील, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# सौ सुप्रिया आप्पासो नरूटे व कु. अनिता सुनील दत्तवाडे यांना अहिल्याबाई होळकर पुरस्कार



शिरोळ : नामदेव निर्मळे

मजरेवाडी तालुका शिरोळ येथील कु सुप्रिया आप्पासो नरूटे व अनिता सुनील दतवाडे यांना अहिल्याबाई होळकर पुरस्कार प्राप्त झाला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रत्येक वर्षी ३१ मे ला उत्कृष्ट कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात येणार आहे. सन्मानपत्र ,सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, देऊन या दोन कर्तबगार महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी ग्रामसेवक वैरागे साहेब ,सरपंच संगीता परिट,लक्ष्मण चौगुले, महेश नरुटे ,रवी नरुटे,किशोर जुगळे ,शेखर कागले ,अजिंक्य नरुटे, राजेंद्र बंडगर मारुती नरुटे, आप्पासो नरुटे,ग्रामपंचायत सर्व सदस्य ,ग्रामस्थ व इतर मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम या पुरस्काराचे मानकरी ठरल्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# स्वामी कार्य ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी लंडन पर्यंत पोहोचले : मी. बास्टीयन मिस



अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले स्वामी कार्य ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी लंडन (यु.के) पर्यंत पोहोचल्याचे मनोगत मी. बास्टीयन मिस. ब्रिजीड यांनी व्यक्त केले. ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, नामा भोसले, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# मराठा, मागासवर्गीय, आर्थिक दुर्बल घटक घटकांतील विद्यार्थिनींना नाशिकच्या वसतिगृहात प्रवेशासाठी ३० जूनची मुदत

सोलापूर/प्रतिनिधीः छत्रपती शाहु महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी, पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती, नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा पंचवटी नाशिक येथे मराठा, मागासवर्गीय, आर्थिक दुर्बल घटक अशा घटकांतील २०० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यात येत आहे.


ऑनलाईन अर्ज भरण्यास ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, इच्छुकांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

पत्रकात म्हटले आहे, छत्रपती शाहु महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी, पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, व कुणबी - मराठा लक्षीत गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती, नागपूर यांच्यामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या गटातील ७५ मुलींसाठी तसेच, तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत आर्थिक दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकूण २०० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यात येत आहे. यासाठी आवश्यक निकष, अटी व शर्ती सारथी, महाज्योती संस्था व उच्च व तंत्र शिक्षण यांच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. सारथी व महाज्योतीचे संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज भरण्यास ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे स्व साक्षांकित करून पोस्टाव्दारे / प्रत्यक्ष सारथी संस्थेच्या नाशिक येथील पत्त्यावर दिनांक ३० जूनपर्यंत सादर करावेत.

वसतिगृह लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी शासनाच्या इतर वसतिगृहाच्या योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

वसतिगृहात प्रवेश देण्यात येणाऱ्या पात्र मुलींची यादी संबंधित सारथी/ महाज्योती / उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी कागदपत्रांची पडताळणी करून अंतिम केल्यानंतर सारथीच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. पात्र विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रत्यक्ष दाखल (हजर) होण्याचा दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.अधिक माहितीसाठी - सारथी विभागीय कार्यालय, पत्ता - बॅरेक नंबर - विभागीय आयुक्त कार्यालय आवार नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१, संपर्क क्र. ०२५३-२९९३६८९ ईमेल - sarathinashik@gmail.com संकेतस्थळ https:/ /sarthi-maharashtra.gov.in महाज्योती विभागीय कार्यालय, पत्ता - डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, समाज कल्याण कार्यालय, नाशिक - पुणे रोड नाशिक ४२२०११ संपर्क क्र. ८०८७७५७६३९३ ई मेल - mahajyotinsk@gmail.com संकेत स्थळ https:// mahajyoti.org.in

## शब्दकोडे क्र १६



आडवे शब्द १. चिंचा आल्यात पाडाला- या गीतातील पुढील ओळ ७. वैदूकडची औषधे १०. थेट, सरळ ११. हा खाताना घशात काटा अडकतो १२. मालाचा उठाव १४. मिळाला म्हणजे फायद्याचाच ठरला की! १५. जिजाबाईंचा पुत्र १७. जिरवण्याची ताकद २०. आवडता, प्रिय २१. नंतरचे नवराबायको २२. नमुनेदार २५. दक्षिणा वाटण्याची जागा २७. अति भयानक २९. रेशमाची गुंडाळी (अ.व.) ३०. 'कँटीन' असल्यावर हा कशाला? ३३. भलतेच विरुद्ध ३५. निर्बुद्ध, ढ ३६. दोनवेळा म्हटल्यास कटकट ३७. या काळातील घटना कुणाला कळल्यात! ३८. चकमक ४०. त्वरित, रातोरात ४१. रानरेडा ४२. नातवंडे म्हणजे दुधावरची --! ४३. दुलई ४४. उत्तराधिकारी ४७. फटाक्यात ठासून भरलेला मसाला ४८. काळ्या तोंडाचे माकड ५१. खोदकाम ५२. लिंबूपाणी ५४. न्याहरी-कधी उपासाची, कधी दिवाळीची! ५५. दुसऱ्यासाठी खिशाला चाट ५७. ओळख पटवणारे वैशिष्ट्य ५९. संपणे ६०. जन्मदाता, पिता ६१. माळी ६३. जगातील सगळ्यात घातक कीटक ६५. 'आ'काराची रेषा ६६. आमिषादाखल दाखवण्याचे कंदमूळ ६७. हे शहर काही आता पेन्शनरांचे राहिलेले नाही ६८. पंख ६९. किमान हालचाल ७१. वृद्ध ७२. '--सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला' ७३. धमनी ७४. लोकरूढी, प्रथा ७७. बूड ७८. कोंब, अंकुर ७९. भिंतीवरून सरपटणारा प्राणी ८०. कबूतर ८१. दक्ष, दक्षतेचा इशारा

उभे शब्द १. जादूगाराचे कौशल्य-शर्विलकाच्याही हाती २. शेवट ३. हुबेहूब सोंग वठवणारा ४. घराची अब्रू घालवणारा ५. शंकराचे एक नाव ६. तिबेटी धर्मगुरु ७. पत्ता, शोध ८. तट्ट, फुगलेले ९. लक्ष पण अवधान नाही ११अ. गणेशमंदिरामुळे प्रसिद्ध असलेली पुण्यातील बाग १३. मजल, टप्पा १६. नियमित यात्रा करणारा १८. भरपूर कमाईचे 'जाडजूड; विशेषण १९. दरी २२. बांधकामासाठी कालवलेले मिश्रण २३. फुलांचे दागदागिने २४. टाळ्यांचा आवाज २६. सुकवलेली काळी द्राक्षे २८. रात्रभर ३१. लहान मूल ३२. आदित्यवार ३४. संत ज्ञानेश्वारांनी केलेली प्रार्थना ३५. बंदी, मज्जाव ३७. शिवशाहीचा ध्वज ३९. लिहिलेला लेख, संदेश इ. ४०. बांबूची मोठी टोपली, हारा ४५. एकरुप ४६. काम इ. लांबणे ४८. वारा, वायू, त्रास ४९. कच्चे लिखाण (इंग्रजी) ५०. वेदनेने ओरडणे, हळहळ व्यक्त करणे ५२. हुक्की, लहर ५३. अव्यवस्था, गोंधळ ५५. पाठशिवणीचा खेळ ५६. -- --- म्हणून लांडोरही नाचते (म्हण) ५७. हिंदीत रक्त ५८. चक्र ६०. पशू ६२. पुरुष ६४. राजाचा सैनिकी अधिकारी ६५. कान व डोळा यामधील भाग ६७. प्राचीन, जुने ७०. टक, दृष्टी ७५. कोरा ७६. त्याप्रमाणे

# पालखी सोहळ्यास पाणीपुरवठा होणाऱ्या सर्व स्त्रोतांची तपासणी करावी : प्रांताधिकारी गजानन गुरव



पंढरपूर/प्रतिनिधी : श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज तसेच अन्य संताच्या पालख्याबरोबर आषाढी यात्रा सोहळ्यासाठी पंढरपूरात मोठ्या संख्येने वारकरी, भाविक येतात. पालखी सोहळ्याबरोबर येणाऱ्या भाविकांना पालखी मार्गावर तसेच पंढरपूर शहरात व परिसरात स्वच्छ व मुबलक प्रमाणात पाणी मिळावे यासाठी पालखी मार्गावरील तसेच शहरातील पाणीपुवठा करणाऱ्या जल स्त्रोतांची तपासणी करावी अशा सूचना प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिल्या.

आषाढी यात्रा कालावधीत पालखी मार्ग तसेच शहरातील पाणीपुरवठा व्यस्थापनाबाबत प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, महावितरणचे कार्यकारी अभियंता बी.ए.भोळे तसेच संबधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव म्हणाले, पंढरपूर तालुक्यात पालखी मार्गावर ७१९ जलस्त्रोत व टॅकर भरण्यासाठी १२ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. तसेच आषाढी यात्रा कालावधीसाठी मुबलक पाणी पुरवठा यासाठी पंढरपूर शहर व परिसरात ३६ बोअरवेल, ५० हातपंप, टॅकर भरण्यासाठी दोन ठिकाणे व ६५ एकर येथील पाणीपुरवठा व्यवस्था नगरपालिकेच्या वतीने करण्यात आली आहे. यासर्व ठिकाणच्या जलस्त्रोतांची तपासणी करावी तसेच ज्या ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य अशा ठिकाणी ठळक माहिती फलक लावावेत. पालखी मार्गावरील टॅंकर भरण्याच्या ठिकाणी कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी. आवश्यक ठिकाणी रस्ता दुरुस्ती करावी. महावितरण विभागाने पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या स्त्रोतांचा विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही यांची दक्षता घ्यावी. पाण्यात क्लोरिनचे योग्य प्रमाण राहिल याची दक्षता आरोग्य विभागाने घ्यावी, असेही प्रांताधिकारी गुरव यांनी सांगितले. तसेच वारी कालावधी पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या टॅंकरना वाहतुकीस अडथळा येणार नाही याबाबत वाहतुक नियोजन करावे. पाटबंधारे विभागाने वारी कालावधी नदीपात्रात पाणी सोडण्याबाबत नियोजन करावे अशा सूचनाही प्रांताधिकारी श्री.गुरव यांनी यावेळी दिल्या. यावेळी आषाढी यात्रा कालावधीत भाविकांना तसेच शहरातील नागरिकांना स्वच्छ व मुबलक प्रमाणात पाणी पुरवठा होण्यासाठी नगरपालिकेकडून आवश्यक नियोजन करण्यात आले असल्याचे मुख्यधिकारी अरविंद माळी यांनी यावेळी सांगितले



# महाराष्ट्र मराठी पत्रकार संघाच्या वतीने डॉ.रविंद्र बनसोडे यांचा सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी : रुग्णसेवा,जणसेवा,समर्पण,निष्ठा,मेहनत व संघर्ष या पंचसूत्रीच्या माध्यमातून,अल्पावधीतच आपला वेगळा ठसा उमटविणारे डॉ.रविंद्र बनसोडे यांनी गरिब रुग्णांची केलेली सेवा कौतुकास्पद व आदर्शवत आहे. डॉक्टरांनी सामाजिक बांधीलकीचे भान ठेवून सामाजिक बांधीलकी जपली आहे.असे प्रतिपादन संघाचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व अमोल पुटगे मित्र परिवाराच्या वतीने डॉ.बनसोडे यांच्या वाढदिवसानिमित्त ललित नर्सिंग होम येथे आयोजित सत्कारप्रसंगी कमलाकर सोनकांबळे बोलत होते.यावेळी संघाचे सचिव विश्वनाथ चव्हाण,ज्येष्ठ पत्रकार राजेश जगताप, छात्र भारती प्रदेश संघटक सचिन बनसोडे , पत्रकार गौतम बाळशंकर,ज्येष्ठ पत्रकार समाधान अहिरे,ज्येष्ठ पत्रकार चेतन जाधव,जेष्ठ पत्रकार महेश गायकवाड उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.रविंद्र बनसोडे म्हणाले की, धकाधकीच्या व स्पर्धेच्या या काळात पत्रकारिताही प्रचंड धावपळीची झाली आहे,या धावपळीत पत्रकारांचे स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते असते.योग्य वेळेवर योग्य त्या तपासण्या केल्या नाहीत.तर त्याचे परिणाम अनेकांना आयुष्यभर भोगावे लागतात. हीच बाब लक्षात घेऊन ललित नर्सिंग हॉस्पिटल यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातील पत्रकारांच्या मोफत आरोग्य तपासणी करण्याची विडा उचललेला आहे.यापुढील काळात पत्रकारांच्या आरोग्याची काळजी ललित हॉस्पिटल'ची असेल असे म्हणाले. यावेळी सलगर ग्रामपंचायत सदस्य अमोल पुटगे, परशुराम बगळे, हन्नुर माजी सरपंच कोंडीबा सोनकांबळे, परशुराम पुटगे, किरनळीचे असलम मुल्ला आदी उपस्थित होते यावेळी सूत्रसंचालन गौतम बाळा शंकर यांनी केले आभार विश्वनाथ चव्हाण यांनी मानले.

# चक्क शेतामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



पत्रकार नामदेव निर्मळे

दानवाड तालुका शिरोळ येथे कल्लाप्पा पाटील यांच्या शेतामध्ये मेंढपाळ यांनी मेंढी शेतामध्ये बसवले होते.

या शेतामध्ये आज पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे फोटो पूजन करून जयंती शेतामध्ये साजरी केली. धनगर समाजाचे आराध्य दैवत मेंढपाळ असल्यामुळे कोठेही कार्यक्रमाला जाता येत नाही. असंख्य मेंढ्या असल्यामुळे त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे.वेळ नसल्याकारणाने शेतामध्ये मेंढी बसवलेल्या ठिकाणी जयंती साजरी करून सर्वांना आश्चर्य केले. प्रत्येक जण आपले जीवनमान जगत असतो.वेळेत वेळ काढून जयंती साजरी केली व एक परंपरा जपली. याचे सर्वांना आश्चर्य वाटत आहे. व चर्चेचा विषय बनला.यावेळी यशवंत सेना जिल्हाध्यक्ष अमर पुजारी, यशवंत सेना टाकळीवाडी उपाध्यक्ष बिरेश भमाणे, सामाजिक कार्यकर्ते तुकाराम भमाणे, शिरोळ तालुका पशुवैद्यकीय अधिकारी कुरुंदवाडे साहेब, वन अधिकारी खामकर साहेब, अण्णाप्पा शिरढोणे, धनपाल भमाणे, लक्ष्मण भमाणे, सुरेश धनगर, चंदू धनगर, रामा एडके, विठ्ठल धनगर, अमुक सिद्ध धनगर, बिरा धनगर आदी उपस्थित होते.

# स्वामी कार्य ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी लंडन पर्यंत पोहोचले : मी. बास्टीयन मिस



अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले स्वामी कार्य ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी लंडन (यु.के) पर्यंत पोहोचल्याचे मनोगत मी. बास्टीयन मिस. ब्रिजीड यांनी व्यक्त केले.

ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

यावेळी न्यासाचे एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, नामा भोसले, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# बारामतीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नामकरण

## वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन यांची माहिती

मुंबई : बारामती, जि.पुणे येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन यांनी दिली.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून शासनाच्या वतीने त्यांच्या कर्तृत्वाच्या गौरव म्हणून आज या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला असल्याची माहिती, मंत्री श्री. महाजन यांनी दिली. सन २०१३ च्या शासन निर्णयान्वये बारामती येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ५०० रूग्ण खाटांचे रूग्णालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सन २०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थी प्रवेशास परवानगी देण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यकाळात अनेक समाजोपयोगी, लोकहिताची कामे केली असून शिस्तप्रिय, कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी अनेक लढाया जिंकल्या होत्या अशा राजमातेच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नामकरण करण्यात येत असल्याची माहिती, मंत्री श्री. महाजन यांनी आपल्या शासकीय निवासस्थानी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

# कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचा जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार

कळंब/दै.यशसिद्धी न्युज : उस्मानाबाद अखिल भारतीय कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी कर्नाटक विधानसभा निवडणुकीत मिळवलेल्या यशाबद्दल उस्मानाबाद जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने वरिष्ठ उपाध्यक्ष खलील सय्यद यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

मल्लिकार्जुन खरगे यांचा दिल्ली स्थित निवासस्थानी दि. ३१ मे २०२३ रोजी जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे खालील सय्यद यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी महाराष्ट्र, मराठवाडा, व उस्मानाबाद, जिल्ह्यातील कॉंग्रेस पक्षाची राजकीय सद्यस्थिती तसेच अल्पसंख्यांक समाजाच्या विविध प्रश्नांवर त्यांनी चर्चा केली यावेळी कॉंग्रेसचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.



# बार्टी तर्फे राजमाता अहिल्यादेवी जयंती उत्साहात साजरी



सोलापूर/प्रतिनिधी : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी च्या वतीने महासंचालक मा सुनील वारे साहेब व डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण साहेब विभाग प्रमुख यांच्या संकल्पनेतून आज कर्जाळ येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आले समतादुत नालंदा चंदनशिवे यांच्या वतीने ६२ क्रमांक अंगणवाडीस भारतीय संविधान उद्देशिकेचे फोटो फ्रेम भेट देण्यात आली सदर कार्यक्रमास अंगणवाडी सेविका महादेवी मुगळी,जाहेदा फरास श्रुतिका मुगळी ,आरती फताटे उपस्थित होते सुवर्णा चिकणे व सुवर्णा पाटील यांना महिला व बालकल्याण विकास विभाग वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देण्यात आला.

# बार्टीचे २१४ संशोधक विद्यार्थी प्रधान सचिव सुमंत भांगे यांच्या सकारात्मक निर्णयाच्या प्रतीक्षेत



पुणे/प्रतिनिधीः डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्या मार्फत २०१३ पासून झह.ऊ संशोधकांना अधिछात्रवृत्ती देण्यास सुरुवात झाली, परंतु णत्रळ चा नियम डावलून २०१३ ते २०१८ पर्यंतच्या झहऊ संशोधकांना बार्टी प्रशासनाने फक्त ३ वर्षच अधिछात्रवृत्ती दिली. B-NRF-2019 च्या बॅच पासून बार्टी प्रशासनाने नव्या नियमावली नुसार अधिछात्रवृत्ती कालावधी ५ वर्ष व (JRF-2 व SRF-3 = एकूण ५) रक्कम णत्रळ च्या नियमानुसार देण्यास सुरुवात केली. B-NRF-2018 चे 214 PhD संशोधक विद्यार्थी मात्र न्याय आणि हक्काच्या प्रतिक्षेत आहेत - हया संशोधक विदयार्थ्यांचे म्हणणे असे आहे की BANRF- 2018 च्या विदयार्थ्यांना अवॉर्ड लेटर हे ३० जून, २०२० रोजी बार्टी कडून ईमेल द्वारे प्राप्त झाले. UGC ने २०१९ नंतर केलेल्या अधिछात्रवृत्ती रक्कमेतील वाढ BANRF-२०१८च्या संशोधक विद्यार्थ्यांना BARTI प्रशासनाने अदा केली. परंतु अधिछात्रवृत्ती कार्यकाळ हा ५ वर्ष न देता फक्त ३ वर्षच मान्य करत आहे. ३० जून २०२० रोजी अवॉर्ड लेटर प्राप्त झाल्यामुळे BANRF-2018 चे विद्यार्थी आधीच ५ वर्षाच्या सरसकट अधिछात्रवृत्ती साठी पात्र आहेत, ही बाब प्रशासनाच्या का लक्षात येत नाही?

BANRF- 2018 चे संशोधक विद्यार्थी गेली १४ ते १५ महिने आपल्या हक्काच्या न्यायासाठी झगडत आहेत. ८ मार्च, २०२२ रोजी महिला दिनी संशोधक महिलांना बार्टी कार्यालयासमोर उपोषण, आंदोलन करावे लागले तरी देखील हा प्रश्न मार्गी लागला नाही. ८ मार्च, २०२३ रोजी पुन्हा संशोधक महिलांना उपोषण करण्याची वेळ येते. ११ एप्रिल २०२३ रोजी महात्मा फुले जयंती तसेच १४ एप्रिल, २०२३ रोजी डॉ. बाबासाहेबांची जयंती देखील बार्टी कार्यालयाच्या दारात उपोषण करून साजरी करावी लागते, त्यासारखे दुदैव नाही.संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधन करावे की उपोषणे, आंदोलने असा प्रश्न निर्माण करण्यास प्रशासनाने भाग पाडले आहे. कारण गेली ४६ दिवस झाले. BANRF-2018 चे संशोधक विद्यार्थी बार्टी कार्यालय, पुणे येथे उपोषण व आंदोलने करत बसली आहेत. हे उपोषण दोन वर्षातील ६ वे उपोषण आहे. परंतु मंत्री महोदय, प्रशासन अधिकारी फक्त सकारात्मक निर्णय घेऊ अशी फक्त पोकळ आश्वासने देत आहेत, पण प्रत्यक्षात कृती होत नाही.बार्टीचे महासंचालक वारे सर असे म्हणतात की, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हे नियामक मंडळाचे अध्यक्ष असल्याकारणाने सुमंत भांगे सरच निर्णय घेऊ शकतात किंवा शासन निर्णय होऊ शकतो परंतु भांगे सरांच्या म्हणण्यानुसार बार्टी चे महासंचालक श्री.सुनिल वारे सर हेच निर्णय घेऊ शकतात, कारण बार्टी ही स्वायत्त संस्था आहे. वारे सर वरील आदेशाची वाट पहात आहेत, अर्थातच संशोधक विद्यार्थ्यांवर टोलवा-टोलवी चे राजकारण दिसून येत आहे. भांगे साहेब प्रशासनाची व विद्यार्थ्यांची वारंवार दिशाभूल करत असल्याचे दिसून येते.तसेच मुख्यमंत्री साहेबांना संशोधक विद्यार्थी कृती समिती, २०१८ भेटल्यावर मुख्यमंत्री साहेबांनी भांगे सरांना बोलण्याचे आश्वासन दिले. परंतु, भांगे सरांनी मुख्यमंत्री साहेबांचा आदेश ही डावलेला दिसून येतो. श्री. सुमंत भांगे हे सामाजिक न्याय विभागाचे सचिव असून नियामक मंडळाचे अध्यक्ष आहेत. तरी देखील नियामक मंडळाच्या बैठकीत हा विषय रीतसर बाजूला केला जातो, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या सकारात्मक निर्णयाला सुमंत भांगे कडून केराची टोपली दाखवली जात आहे. तर श्री. वारे नी देखील BANRF-2018, Ph.D संशोधकांना वाऱ्यावर सोडल्याची जाणीव होत आहे. उपाशी पोटी संशोधन होत नाही असे संशोधक विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. शासनाने BANRF-2018च्या बॅंचचा विचार करावा कारण कोरोना व लॉक डाऊन मुळे अगोदरच विदयार्थ्यांचे सर्व बाजूने नुकसान झाले असून अधिछात्रवृत्तीच्या प्रलंबित प्रश्नामुळे आणखी नुकसान होत आहे. संशोधकांवरती पोलिसांचाही दबाव येत असून नोटिस दिलेल्या आहेत. BANRF-2018 चे विद्यार्थी ५ वर्ष फेलोशिप साठी पात्र आहेत तरी देखील अद्याप त्यासंदर्भात निर्णय होत नाही. शासनाने तसेच प्रशासनाने त्वरित न्याय नाही दिल्यास उपोषण स्थळी सामुदायिक आत्म-दहन करण्याची परवानगी द्यावी असे संशोधक कृती समितीच्या सदस्यांचे म्हणणे आहे. कारण संशोधक विद्यार्थ्यांचा संयम आता संपत आला आहे याचा विचार व्हावा. आणि जोपर्यंत संशोधक विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य होणार नाहीत. तोपर्यंत उपोषण आणि धरणे आंदोलन मागे घेणार नाही; असे उपोषणकर्ते छाया बनसोडे, वंदना भिसे, संगप्रिया मानव, सिद्धनाथ गाडे, राहुल बनसोडे, प्रविण कांबळे, माधवी कांबळे, प्रफुल कांबळे, प्रतिभा थोरात, सरोज खंदारे, सुधाकर अहिरे, निखिल आठवले, संगीता वनखंडे, पिराजी वाघमारे, रविंद्र मंडलिक, अनिल करेकांबळे, किशोर ओव्हाळ आणि इतर सहकारी विद्यार्थ्यांनी सांगितले आहे.